# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि  पहिली खबर क्र. FIR No.: ०९  वर्ष Year: २०२६  दिनांक Date: २३/०९/२०..

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम १९८८  कलमे Sections: ७, ७(अ), १२
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: सोमवार  तारीख पासून Date from: १९/०९/२६  वेळ Time: १६:००  तारीख पर्यंत Date to: २२/०९/२६  वेळ Time: १४:१८

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: २१/०९/२०२६  वेळ Time: १६:००

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ............ तारीख Date: २३/०९/२०२६  वेळ Time: ०६:०० स्टे. डा. क्र. 1

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ............

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: बच्चूभाई चौकी  ठिकाणाचे नंबर No. if any: समोरील  गल्ली Ward: पाजटपुरी, व्हि. पी. रोड  रस्त्याचे नाव Name of road: मुंबई

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: सुनिल हाकगोडे  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: केशव हाकगोडे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४५ वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No. ............
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............
(g) धर्म Religion: हिन्दू  जात Caste: मराठा  जनजात Sub-Caste: कुणबी
(h) पत्ता Address: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई ३०  गल्ली/सर्व्हे नं. Ward ............ घर/नाव नं. House Name No. ............ फोन/मो. नं. Phone No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............

रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............

तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदारच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) राजेंद्र शिवाजी व्यवहारे वय - ३५ वर्षे, धंदा - नोकरी (पोलीस शिपाई) व्हि. पी. रोड
2) राज सिंग शिवकुमार सिंग, वय - २९ वर्षे धंदा - व्यवसाय
3) राजेंद्र सर्जेराव आंबिलवाडे वय - ३५ वर्षे, धंदा - नोकरी (पोलीस शिपाई)

फिर्याद

मी सुनिल केशव हारुगडे वय ४५ वर्षे धंदा - नोकरी, (सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई माझी फिर्याद स्वतंत्र कागदावर घेण्यात आली असून तीच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावी.

समक्ष

(स्वाक्षरी)

(नितीन थोरात)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

बृहन्मुंबई विभाग, मुंबई

(स्वाक्षरी)

फिर्याद दिनांक २३/०१/२०२६

मी, सुनिल केशव हारूगडे, वय ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी (सहायक पोलीस आयुक्त), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ९९२१०६३५५३

-----------

मी वरील प्रमाणे असून, दिनाक १५/१०/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे सहायक पोलीस आयुक्त या पदावर नेमणुकीस आहे.

मी सोमवार, दिनांक १९/०१/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ०५/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता चौकशी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोलीस निरीक्षक, नितीन थोरात यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणीमधील तक्रारदार मोहमद वसीम मन्सुरी यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक १६/०१/२०२६ रोजी लोकसेवकाने त्यांचे मोबाईल नंबर ९८८२४५७६९६ वरून कॉल करून त्यांना भेटण्याकरीता गोल मंदिर चौकीजवळ बोलविले. त्यावर तक्रारदार हे सदर ठिकाणी गेले असता, तेथे दोन लोकसेवक तक्रारदार यांना भेटले त्यातील एका लोकसेवकाने त्याचे नाव श्री राजु असे सांगितले व त्याच्या सोबत असलेल्या अन्य लोकसेवकाचे नाव राजेंद्र असल्याचे सांगुन तक्रारदार यांना तुम्ही विनापरवाना इम्पोर्टेड सिगारेटचा धंदा करीत असल्याचे सांगून त्यासंबंधाने तक्रारदार यांना गुन्हयामध्ये आरोपी न करण्याकरीता व सदरचा धंदा चालु ठेवण्याकरीता प्रथम गुडलक म्हणुन रुपये ४०,०००/– व दोघांचे प्रत्येकी महिना रुपये ५०००/– प्रमाणे रुपये १०,०००/– इतक्या रकमेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास सदरची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, वरील नमुद दोन्ही लोकसेवकांनी तडजोडी अंती गुडलकची रक्कम कमी करून २०,०००/– रूपये व दोघांचा प्रत्येकी ५,०००/– रूपये महिना प्रमाणे प्रतिमाह रूपये १०,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. तरी तक्रारदार यांना लोकसेवकांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि. मुंबई येथे दिनांक १९/०१/२०२६ रोजी संगणकावर टंकलेखीत केलेला लेखी तक्रार अर्ज दिला.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री संभाजी वैजनाथ अंभोरे, वय ३२ वर्षे, धंदा – नोकरी, पद – कर सहायक, कार्यालय – वस्तु व सेवाकर विभाग, जी.एस.टी. भवन, माझगाव, मुंबई रा.ठि. – २७८, बिल्डिग न. ४, अभ्युदय नगर, काळा चौकी, मुंबई २) श्री संग्राम भिमराव येडके, वय ४८ वर्षे, धंदा – नोकरी, पद – राज्यकर निरीक्षक, कार्यालय – व्यवसाय कर विभाग, जी.एस.टी. भवन, बांन्द्रे, पुर्व, मुंबई रा.ठि. – ए/५०१, लक्ष्मण नगर को.ऑ.हौ.सो. सेक्टर २, चारकोप, कांदिवली (प), मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोनि नितीन थोरात, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तद्नंतर पोनि थोरात यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार मोहमद वसीम मन्सुरी हे लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेवून त्यांची लाच मागणीबाबत पडताळणी कारवाई करणार आहे. त्यानुसार मी, पोनि थोरात, दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. यादव यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व तक्रारदार यांचे सोबत पाठविण्यात येणारे पंच नंबर ०१ श्री संभाजी अंभोरे यांना पडताळणी कारवाईच्या आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही दिनांक १९/०१/२०२६ रोजी १६.२० वा. लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता बाहेर पडलो. शासकीय वाहनाने मी, पोनि थोरात, तक्रारदार, दोन्ही पंच, सफौ. तेली व पोह यादव असे वाहन चालक पोशि साबळे यांचेसह माझगाव कोर्टाच्या मागील गल्ली मध्ये १६.५० वा. आलो. त्यानंतर १७.२० वा. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९३२१२२६८४३ वरुन लोकसेवक श्री राजु यांचे मोबाईल क्रमांक ९८८२४५७६९६ वर स्पिकर ऑन करुन कॉल केला असता, लोकसेवक श्री राजु यांनी तक्रारदार यांना दिल्ली

दरबार हॉटेल जवळ येण्यास सांगितले. सदरचे संभाषण मी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर १७.२८ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावून पंच श्री अंभोरे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलने दिल्ली दरबार हॉटेलकडे पाठविले. सदर प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री राजु व अन्य लोकसेवक राजेंद्र यांनी तक्रारदार यांचे सोबत त्यांच्या कामाबाबत चर्चा करून लाच रक्कमेबाबत अस्पष्ट बोलणे करून पार्सल पाणटपरी वाल्याजवळ आणुन देण्यास सांगितले. त्यामुळे अधिक खात्री पटविण्याकरीता परत पडताळणी कार्यवाही आयोजीत करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. ठरल्याप्रमाणे मी, पोनि थोरात, दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथक लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यावेळी लोकसेवक राजु यांस त्यांचे मोबाईलवर कॉल करुन लाच रक्कमेबाबत बोलणे करुन त्यानंतर पुढील कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले. दिनांक १९/०१/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले मेमरी कार्डच दिनांक २०/०१/२०२६ रोजी वापरण्यात येणार असल्याने सदरचे सीलबंद मेमरी कार्ड हे पंचासमक्ष उघडण्यात आले. सदर मेमरी कार्डमध्ये लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार यांचे सांगण्याप्रमाणे आम्ही लोकसेवकाचा समोरून कॉल येतो किंवा कसे याची एक ते दोन तास वाट पाहिली. परंतु लोकसेवकाने समोरून कॉल न केल्याने १४.२७ वा. चे दरम्यान तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९३२१२२६८४३ वरुन लोकसेवक श्री राजु यांचा मोबाईल क्रमांक ९८८२४५७६९६ वर स्पिकर ऑन करुन कॉल केला. तेव्हा तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये चर्चा झाली व त्यादरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांना 'कॉल करता हू...' असे म्हणुन कॉल कट केला. सदरचे संभाषण हे मी पंचासमक्ष माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले. सदर संभाषणामध्ये लोकसेवक यांनी कॉल करतो म्हणून सांगितल्याने आम्ही सर्व लोकसेवक यांची समोरून कॉल येण्याची वाट पाहत थांबून राहीलो. परंतु १८.०० वा. पर्यंत लोकसेवकाने समोरून कॉल न केल्याने दिनांक २०/०१/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली व लोकसेवक राजु यांनी तक्रारदार यांना समोरून कॉल केल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेवक राजु यांचा समोरून कॉल आल्यास सदरचा कॉल न उचलता प्रथम त्याची माहिती मला देण्याबाबत सुचित केले.

दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा पासुन आम्ही सर्व सापळा पथक, दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयात हजर राहुन लोकसेवक राजु यांचा फोन तक्रारदारास येईल याची वाट पाहत थांबुन राहीलो. सायंकाळ पावेतो तक्रारदार यांना लोकसेवक यांचा कॉल न आल्याने व तक्रारदार यांनी त्यांना दुसरे महत्वाचे काम असल्याचे सांगीतल्याने आम्ही त्या दिवसाची पडताळणी कार्यवाही स्थगीत करून तक्रारदार यांना घरी जाण्याबाबत सुचित केले. त्यावेळी पंच व इतर सापळा पथक कार्यालयात थांबुन होते. तेव्हा तक्रारदार यांनी मला फोन करून कळविले कि, ते त्यांचे निवासस्थानी जात असतांना त्यांना लोकसेवक श्री राजु यांचे मोबाईल क्रमांक ९८८२४५७६९६ वरुन १६.४४ वा. कॉल आला असता त्यांनी तो कॉल उचलला नाही व ते परत लाप्रवि कार्यालयास हजर येत आहेत. साधारण: १७.०० वा. तक्रारदार हे कार्यालयास परत हजर आले.

समक्ष,

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

त्यानंतर, माझे सुचनेप्रमाणे पोह यादव यांनी दिनांक १९/०१/२०२६ व २०/०१/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले सीलबंद मेमरी कार्ड हे पंचासमक्ष उघडले. सदर मेमरी कार्डमध्ये लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

ठरल्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९३२१२२६८४३ वरुन लोकसेवक श्री राजु यांचा मोबाईल क्रमांक ९८८२४५७६९६ वर स्पिकर ऑन करुन व्हॉटसअॅप कॉल केला असता लोकसेवक श्री राजू यांनी तक्रारदार यांना नळबाजार येथे बोलविले. सदरचे कॉलवरील संभाषण हे मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले.

मी व पोनि थोरात यांनी तक्रारदार व पंच श्री अंभोरे यांना पडताळणी कारवाईच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. आम्ही सापळा पथक १७.३० वा. पंच व तक्रारदार यांचेसह पडताळणी कारवाईकरीता शासकीय वाहनाने रवाना झालो. १७.५५ वा. आम्ही सर्व माझगाव कोर्टाच्या मागील गल्ली जवळ आलो. १८.१६ वा. मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री अंभोरे हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलने नळबाजारला गेले. सदर प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री राजु व त्यांचे सहकारी श्री राजेंद्र यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम गुडलक म्हणुन देण्यात येणाऱ्या २०,०००/— लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हप्ता रूपये १५,०००/— स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचेची रक्कम दिनांक १९/०१/२०२६ रोजी सांगीतलेल्या बच्चु भाई पोलीस चौकी समोरील पान टपरीवाल्याकडे देण्यास सांगितले.

दिनांक २२/०१/२०२६ रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही सापळा पथक, दोन्ही पंच लाप्रवि कार्यालयात सकाळी १०.०० वा. हजर झालो. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे रूपये १५,०००/— लाचेची रक्कम हि पान टपरीवाल्याकडे देण्याबाबत सांगितल्याने आज रोजी लाप्रवि कार्यालयास प्रथम सर्वांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून लाप्रवि कार्यालयातच सापळा पुर्व कारवाई करून पान टपरीवाल्याकडे सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. दिनांक २२/०१/२०२६ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये नविन मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याने मी पोह यादव यांना सांगुन नविन मेमरी कार्ड हजर करण्यास सांगितले व सदर मेमरी कार्डमध्ये लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

मी व पोनि थोरात यांनी पंच, तक्रारदार व पोलीस पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना पानपट्टीवरील खाजगी इसमास लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे डावा हात वारंवार केसांवरून फिरवण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये १५,०००/— इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. १५,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या ३० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर पो.ह. शेमडकर यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पो.ह. शेमडकर यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये १५,०००/— रक्कमेतील नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये ठेवुन सदर पाकीटास देखील दोन्ही बाजूने अॅन्थ्रोसिन पावडर लावून ते पाकीट तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवले. त्यानंतर पोह. शेमडंकर हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याने त्यांचे दैनंदिन काम करण्याकरीता निघून गेले.

त्यानंतर मी, पोनि थोरात, दोन्ही पंच, तक्रारदार व पथकातील अंमलदार सापळा कारवाईकरीता दोन शासकिय वाहनाने १३.१५ वा. लाप्रवि कार्यालयातून बाहेर पडलो. १३.५५ वा. आम्ही सर्व माझगाव कोर्टाच्या

समक्ष,

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

जवळ आलो. त्यादरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्या मित्रास कॉल करुन दुचाकी मोटार सायकल घेवुन बोलाविले. त्याप्रमाणे तक्रारदार यांचा मित्र मोटार सायकल घेवून पोलीस वाहनाजवळ आला. १४.१४ वा. मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री संभाजी अंभोरे हे लाचेच्या रक्कमेसह बच्चुभाई पोलीस चौकीसमोर असलेल्या पानपट्टीच्या दिशेने रवाना झाले त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच टॅक्सीने रवाना झालो. ठरल्याप्रमाणे पोनि थोरात व काही सापळा पथक हे बच्चुभाई पोलीस चौकीसमोर असलेल्या पानपट्टीजवळ कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीले व मी व माझे सोबत असलेले उर्वरीत सापळा पथक असे आम्ही लोकसेवक बसत असलेल्या पिला हाउस, दिल्ली दरबार रेस्टॉरंन्टच्या बाजूस असलेल्या पोलीस चौकीच्या जवळपास कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच श्री अंभोरे हे मोटार सायकलवरून प्रथम लोकसेवक बसत असलेल्या दिल्ली दरबार रेस्टॉरंन्टच्या बाजूस असलेल्या पोलीस चौकीजवळ आले व ते दोघेही चौकीमध्ये गेले. काही वेळाने तक्रारदार व पंच श्री अंभोरे हे चौकीच्या बाहेर आले व पुन्हा मोटार सायकलवरून बच्चुभाई पोलीस चौकीसमोर असलेल्या पानपट्टीजवळ गेले तेथे तक्रारदार हे काही वेळ मोबाईल फोनवर बोलू लागले त्यानंतर तक्रारदार यांनी लाचेच्या रक्कमेचे पाकीट पानटपरीवर असलेल्या इसमास दिले व सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे खाजगी इसमाने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच पोनि थोरात व सापळा पथकाने लागलीच खाजगी इसमास १४:५८ वा. लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर खाजगी इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजसिंग शिवकुमार सिंग, वय ३१ वर्षे, धंदा – पॉनशॉपमध्ये नोकरी, राठि – कौशल्या सदन, बी विंग, रूम नंबर ६०८, मुंब्रा कॉलनी, दिवा (पुर्व), ठाणे असे सांगितले. त्यांनतर पोनि थोरात यांनी मला कॉल करून खाजगी इसमास ताब्यात घेतल्याचे कळविले. त्यानंतर मी व माझे सोबत असलेल्या पथकाने पोलीस चौकीमध्ये असलेल्या तक्रारदार यांनी सांगितलेल्या वर्णनाच्या लोकसेवकास ताब्यात घेतले. मी लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजेंद्र शिवाजी व्यवहारे, वय ३५ वर्षे, धंदा – नोकरी, पोशिक्र. ११०८००, राठि – रूम नंबर २०२, बी विंग, वैष्णवी पार्क, नांदीवली, कल्याण (पुर्व), ठाणे असे सांगितले. लोकसेवक राजेंद्र व्यवहारे यांना त्यांचे सहकारी लोकसेवक राजु यांचेबाबत विचारणा केली असता, त्यांनी लोकसेवक राजु यांचे पुर्ण नाव राजेंद्र सर्जेराव आंबीलवाड, पोशिक्र. १३०५८१, नेमणूक – व्ही. पी. रोड पोलीस ठाणे, मुंबई राठि – रूम नंबर १००५, श्री आनंद हेरिटेज, बी विंग, जय मल्हार हॉटेलजवळ, हाजीमलंग रोड, कल्याण (पुर्व), ठाणे असे सांगून ते आजपासुन सुट्टीवर असल्याचे सांगितले. त्यानंतर दिल्ली दरबार जवळ असलेल्या पोलीस चौकीमध्येच पुढील कार्यवाही पुर्ण करून उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या लोकसेवक राजेंद्र व्यवहारे व खाजगी इसम राजसिंग यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक २१/०१/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री राजेंद्र व्यवहारे व श्री राजेंद्र आंबीलवाड यांनी तक्रारदार यांचेकडे ते विनापरवाना इम्पोर्टेड सिगारेट विक्रीचा धंदा करीत असल्याचे सांगून त्यांना विनापरवाना इम्पोर्टेड सिगारेट विक्रीच्या गुन्हयामध्ये आरोपी न करण्याकरीता व सदरचा धंदा चालु ठेवण्याकरीता तडजोडीअंती सुरूवातीस गुडलक म्हणुन रुपये २०,०००/– व दोघांचे प्रत्येकी महिना रुपये ५०००/– प्रमाणे रुपये १०,०००/– इतकी रक्कम खाजगी इसमा मार्फत स्विकारण्याचे संमती दर्शविली. तर खाजगी इसम पानटपरी चालक श्री राजसिंग शिवकुमार सिंग यांनी दिनांक २२.०१.२०२६ रोजी आयोजीत केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील नमुद लोकसेवक श्री आंबीलवाड यांच्या सांगण्यावरून लोकसेवक यांचेकरीता लाचरक्कम १५,०००/– रूपये स्वत:कडे स्विकारून लोकसेवक यांना लाच घेण्यास सहकार्य केले. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, ७ अ व १२ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता. वेळी ठिकाणी 'फि'च्या इम्पोर्टेड सिगारेट विक्रीचा व्यवसाय असून यातील आलोसे क्र. २ यांनी 'फि' स दि. १६/०९/२०२६ रोजी मोबाईल फोन करून गोल देऊळ येथे भेटण्यास बोलाविले. तेथे आलोसे क्र. १ व २ यांनी 'फि'स विनापरवाना इम्पोर्टेड सिगारेट विक्रीच्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी सुरुवातीस गुडलक म्हणून ४०,०००/- रु. व त्यानंतर मासिक १०,०००/- रु लाचेची मागणी करून तडजोडी अंती गुडलक रक्कम २५,०००/- व त्यानंतर व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी मासिक १०,०००/- रु लाच स्विकारण्यास संमती दिली. दि. २१/०९/२६ रोजीच्या पडताळणी दरम्यान लाच मागणी स्पष्ट झाल्याने दि. २२/०९/२६ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता नितीन भुजंगराव थोरात पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई यातील आ. क्र. २ खाजगी इसम याने आलोसे क्र. १ व २ यांचे करीता लाचेचा पहिला हफ्ता रु. १५,०००/- स्विकारल्याने त्यास जागीच ताब्यात घेण्यात आले म्हणून नोंद

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............

(3) Transferred to P. S. ............

District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... नितीन भुजंगराव थोरात

पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ... ला. प्र. वि.; मुंबई

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

31

Attachment to item 7 of First Information Report